शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती - ४४४६०४
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
" Towards Global Technological Excellence"
दु.क्र. (०७२१) २५३१९३०, २५३१९२९ फॅक्स – (०७२१) २५३१९३१
संकेतस्थळ : www.gcoea.ac.in ईमेल – principal@gcoea.ac.in

स्मरणपत्र

क्र.शाअमअ/वि.वि./Eligibility List/२०२४/ 5796
दिनांक : 07/११/२०२४

संदर्भ:- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.शाअमअ/वि.वि./ Eligibility/२०२४/४७४९,दि.१४/१०/२०२४
२) संत गाडगे बाबा अमरावती विद्यपीठ,अमरावती यांचे पत्र क्र.संगाबाअवि/३/सारणी/८९३/२०२४, दि.१८/१०/२०२४

संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकाचे अवलोकन करावे, सदर परिपत्रकान्वये संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या अंतिम वर्ष **बी. टेक** व एम.टेक. च्या **Summer Term-२०२४** मधील पदवी व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी शाखेच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांचां निकाल घोषित करण्यात आल्यामुळे उत्तीण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कागदपत्रे तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांची Eligibility (**CGPA सह**) विभागाकडुन विद्यार्थी विभागास पाठविण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

असे निदर्शनास येते की, काही विद्यार्थी उत्तीर्ण कागदपत्रासाठी विद्यार्थी विभागास येतात परंतु त्यांची पदवी पात्र असल्याची Eligibility विद्यार्थी विभागास प्राप्त झाली नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे उतीण झाल्याचे कागदपत्रे विद्यार्थी विभागाकडुन काढल्या जात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यानां कागदपत्राअभावी परत जावे लागते.

**तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यपीठ,अमरावती यांचे संदर्भ क्र. २ चे पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या अंतिम वर्ष बी. टेक व एम.टेक. उत्तीर्ण विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्राकरीता एकत्रित माहीती दि. १८/११/२०२४ पर्यत सादर करावयाचे सुचित केले आहे.**

करीता सर्व विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, विभागातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील अंतिम वर्ष **बी. टेक व एम.टेक.** अभियांत्रिकी विद्याशाखेच्या **Winter २०२३ , Summer-२०२४** व **Summer Term-२०२४** मध्ये उत्तीण पदवी व पदव्युत्तर पदवी पात्र विद्यार्थ्यांचें पदवी प्रमाणपत्राची माहीती एकत्रित पाठविण्यासाठी ज्या उत्तीण विद्यार्थ्यांची Eligibility अध्यापपर्यत पाठविलेली नसेल त्यांची Eligibility तात्काळ कार्यालयास सादर करावी. जेणेकरुन एकत्रित माहीती विद्यापिठास सादर करणे सोईचे होईल.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
अमरावती.

प्रत:- १) विभाग प्रमुख स्थापत्य, उपयोजीत यंत्रशास्त्र, यंत्र, विद्युत, अणुविद्युत, संगणक, उपकरणीकरण, माहीती तंत्रज्ञान यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता रवाना.
२) परिक्षा नियंत्रक यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
३) समन्वयक, डाटा सेन्ट्रर आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.